# चंद्रपूर शहर महानगरपालीका, चंद्रपूर

## विशेष कंत्राटी पदभरती–३

जावक क्रमांक : चंशमनपा/आ.वि./183/2020 दिनांक 10.09.2020

# :: पदभरती जाहिरात ::

चंद्रपुर शहर महानगरपालिका, आरोग्य विभाग, चंद्रपुर अंतर्गत कोरोना विषाणू (कोवीड-१९) प्रादुर्भाव लक्षात घेता उद्रेक सदृश्य परिस्थिती हाताळण्यासाठी तसेच Epidemic Act 1897 अधिकारा अंतर्गत खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे कंत्राटी व करारपध्दतीने कोवीड संपेपर्यंतचे कालावधी करीता मानधन तत्वावर खालील पदांकरीता विहीत अर्हता पात्र उमेदवारांची थेट मुलाखत घेण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता | आवश्यक पदे | मानधन दरमहा |
|---|---|---|---|---|
| 1. | ANM | ANM Course, MNC Registration Certificate | 28 | 17000/- |
| 2. | Lab Technician | B.Sc. DMLT | 14 | 17000/- |
| 3. | Pharmacist | D.Pharm / B.Pharm | 03 | 17000/- |

**सर्वसाधरण अटी व शर्ती :-**

१. चंद्रपुर शहरात सक्षम काम करण्यास तयार आणि मधुमेह/उच्च रक्तदाब/हृदयविकार इ. नसणा-या सेवानिवृत्त कर्मचारी, बॉंड संपलेले नर्सेस यांना सदर पदभरती करीता प्राधान्य देण्यात येईल. सेवानिवृत्त कर्मचारी यांनी अर्जात सेवानिवृत्त कर्मचारी यांचे संपुर्ण नाव, संपुर्ण पत्ता, मोबाईल क्रमांक, ई-मेल आयडी, जन्म दिनांक, शासकिय सेवेतुन ज्या पदावरुन सेवानिवृत्त झाले त्या पदाचे नाव व संस्थेचे नाव, सेवानिवृत्तीचा दिनांक, शासकिय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याचा पुरावा, वरील नमुद आजार नसल्याबाबत स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसेच बॉंड संपलेले नर्सेस यांनी अर्जात यापुर्वी केलेल्या सेवेचा संपुर्ण तपशिल नमुद करावा. सदर कर्मचारी अनुभवी असल्यामुळे त्यांची यादी तयार करुन त्यांच्या आरोग्य विषयक सेवा लगेचच घेता येईल.

२. विहीत नमुन्यातील अर्जातच परिपुर्ण माहिती भरुन अर्ज व संपुर्ण आवश्यक मुळ दस्ताऐवज सोबत झेरॉक्स प्रतिसह कोरोना कक्ष, चंद्रपुर शहर महानगरपालिका, गांधी चौक, चंद्रपुर येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.

३. सर्व उमेदवारांनी सोबत जोडलेल्या अर्जाच्या नमुन्यात अर्ज करणे बंधनकारक राहील.

४. अर्जासोबत १) वयाचा पुरावा, २) पदवी/पदवीका प्रमाणपत्र, ३) शेवटच्या वर्षाची गुणपत्रिका, ४) संबंधित पदांकरीता तत्सम कौन्सिलचे नोंदणी प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. ५) शासकिय/निमशासकिय संस्थांमध्ये केलेल्या कामाचे अनुभव प्रमाणपत्र एवढीच कागदपत्रे सादर करावीत.

५. उमेदवारांची निवड झाल्यास त्यास कोवीड-१९ साठी तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक देण्यात येणार असुन, त्यांची नेमणुक ही कोवीड-१९ साथ कालावधी पर्यंतच राहणार असुन सदर साथ कमी झाल्यास किंवा कोवीड-१९ उपचार कक्ष बंद झाल्यास सदरील नेमणूक आपोआप संपुष्टात येईल. त्यासाठी १ महिन्याची पुर्व नोटीस दिली जाणार नाही.

६. पदासमोर नमुद मानधन हे एकत्रित मानधन असून त्याव्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते देय राहणार नाही.

७. गुणानुक्रमे सर्वात वर असलेल्या उमेदवाराची गुणवत्तेनुसार नेमणुक करण्यात येईल.

८. रुपये १०० च्या स्टॅम्प पेपरवर करारपत्र भरुन देणे बंधनकारक राहील.

९. उमेदवारांच्या शैक्षणिक अर्हतेवरुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येईल. मेरीट लिस्ट तयार करतांना Qualifying Exam मध्ये मिळालेले गुण + उच्च शैक्षणिक अर्हता + शासकिय/निमशासकिय कार्यालयाचा अनुभव या बाबींचे गुण एकत्र करुन मेरीट लिस्ट तयार करण्यात येऊन संबंधित पात्र उमेदवारास नियुक्ती आवश्यकतेनुसार आदेश निर्गमित करण्यात येईल.

१०. अर्जदार हा संबंधित पदासाठी शारिरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

११. सदर रिक्त पदांच्या संख्येत पदस्थापनेच्या ठिकाणामध्ये बदल करण्याचे सर्व अधिकार हे या कार्यालयाचे असुन निवड प्रक्रियेत कोणत्याही क्षणी बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष निवड समिती मनपा चंद्रपुर यांनी राखुन ठेवलेले आहेत.

१२. पुनर्नियुक्तीबाबत, शासकिय नियमित सेवेत सामावून घेणेबाबत किंवा शासनामार्फत सेवा संरक्षणाबाबत उमेदवारांना कुठलाही दावा करता येणार नाही.

१३. अर्जदाराला कंत्राटी कालावधीत त्यांचे सोईनुसार ठिकाण बदलून मिळण्याची मागणी करता येणार नाही. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांना त्यांना दिलेल्या कार्यक्षेत्रात मुख्यालयी राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

१४. अर्जदारांनी आपल्या अर्जावर त्यांचे सध्या सुरु असलेला मोबाईल नंबर व ई-मेल आयडी अचूक नोदवावा. तसेच ते भरतीप्रक्रिया पुर्ण होईपर्यंत सुस्थितीत राहील, याची दक्षता घ्यावी.

१५. सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २५ एप्रिल, २०१६ चे शासन निर्णयास अनुसरुन अर्ज करण्याच्या शेवटच्या दिनांकास उमेदवाराचे किमान वय १८ वर्षे व कमाल वय खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्गीय करीता ४३ वर्षे राहील. तसेच सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांची सेवाप्रवेश व सेवासमाप्तीची वयोमर्यादा ६५ वर्षे इतकी असून वय ६० किंवा त्यापेक्षा अधिक वयाच्या उमेदवारांनी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून प्राप्त केलेले शारिरीकदृष्टया सक्षम असल्याचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

१६. भरती प्रक्रिये दरम्यान ज्या-ज्या उमेदवारांना बोलविण्यात येईल, त्या-त्या वेळी त्यांना स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल. तसेच सदर उपस्थितीकरीता कोणतेही मानधन अथवा प्रवास खर्च देय राहणार नाही.

१७. भरती प्रक्रिये दरम्यान उमेदवाराने चुकीची माहिती सादर केल्याचे, कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे, दबाव तंत्राचा वापर किंवा अनुचित मार्गाचा अवलंब केल्याचे आढळून आल्यास कोणत्याही टप्प्यावर त्याची उमेदवारी/नियुक्ती कोणतीही पुर्वसुचना न देता रद्द करण्यात येईल.

१८. लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र नमुना-अ या प्रपत्रात अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१९. उमेदवाराने अधिवास व राष्ट्रीयत्वाचे सक्षम अधिका-यांकडून प्राप्त केलेले प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

२०. भरती प्रक्रियेचे संपुर्ण अधिकार, पदे कमी-जास्त करणे, भरती प्रक्रिया रद्द करणे, अटी व शर्तीमध्ये बदल करणे व आवश्यकतेनुसार पदे घेण्याचे इत्यादी सर्व अधिकार सक्षम अधिकारी तथा आयुक्त, मनपा चंद्रपुर यांचेकडे राखुन ठेवले आहे.

**थेट मुलाखतीचे स्थळ :** कोरोना कक्ष, दुसरा माळा, गांधी चौक, मनपा चंद्रपुर.

**थेट मुलाखतीची तारीख व वेळ :** दिनांक १४/०९/२०२० सकाळी ११:०० वाजता